आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१६ एप्रिल २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी महाराष्ट्रात अनेक प्रमुख उमेदवारांचे अर्ज दाखल, सांगलीत काँग्रेसचे विशाल पाटील यांची बंडखोरी

- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२३ चे अंतिम निकाल जाहीर, आदित्य श्रीवास्तवचा पहिला क्रमांक

- यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार जेष्ठ चित्रपट अभिनेते अमिताभ बच्चन यांना, तर मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार जेष्ठ संगीतकार ए आर रेहमान यांना जाहीर

- टेबल टेनिस विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या मायका बत्रा आणि श्रीजा अकुला यांची विजयी सलामी

**आणि**

- संपूर्ण कोकणात उद्या, तर आंध्र, तेलंगणा, ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या काही भागांत पुढचे तीन-चार दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी महाराष्ट्रात आज अनेक प्रमुख उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

**कोल्हापुरातून** काँग्रेस उमेदवार शाहू महाराज यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. तर, हातकणंगल्यातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सत्यजित पाटील सरूडकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**उस्मानाबाद** लोकसभा मतदारसंघातून आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, महायुतीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार अर्चना राणा जगजितसिंह पाटील आणि अपक्ष उमेदवार मनोहर आनंद पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग** लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

**सोलापूर** लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांनी आज अर्ज भरला. त्यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनीही आज अर्ज भरला. माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनीही आज अर्ज भरला.

काँग्रेसचे नेते विशाल पाटील यांनी बंडखोरी करत **सांगली** लोकसभा मतदारसंघातून आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

भाजपानं सातारा लोकसभा मतदारसंघातून छत्रपती उदयनराजे भोसले यांना उमेदवारी आज जाहीर केली. गुरुवारी अर्ज भरणार असल्याचं आज त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

<><><><><>

पश्चिम बंगालमधे सरकारनं आठ नव्या शाळा आदिवासी समुदायासाठी बांधल्या असून सरकार जनजातीय गौरव दिवस साजरा करतं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. ते पश्चिम बंगालच्या बालूरघाट मतदारसंघात झालेल्या विजय संकल्प यात्रेच्या जाहीर सभेत बोलत होते. तृणमूल काँग्रेसच्या राजवटीत दलितांवर आणि आदिवासींवर अत्याचार होत असल्याची टीका त्यांनी केली.

भाजपा सत्तेत आल्यानंतर या भागात आणखी सौरऊर्जा यंत्र बसवून वीज बिल शून्यावर आणण्याचं  आणि ३ कोटी नवी घरं बांधण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

रायगंज मतदार संघातही मोदी यांनी प्रचारसभा घेतली. तृणमूल काँग्रेसच्या सत्ताकाळात भ्रष्टाचार वाढत असल्याची टाका त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

गेल्या सलग तीन आर्थिक वर्षांत भारत ही जगात सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि ही वाढ येणाऱ्या काळातही कायम राहू शकते, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज जयपूरमध्ये उद्योगपती आणि व्यावसायिकांशी संवाद साधला. पुढची २५ वर्षे भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या

विश्वासार्हतेमुळे परदेशी गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करण्यासाठी येत आहेत, असं त्या यावेळी म्हणाल्या.

**<><><><>**

निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर विविध पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांनी  उल्लंघन केल्याच्या २०० हून अधिक तक्रारी आल्या आहेत. त्यातील १६९ प्रकरणी कारवाई केल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर १६ मार्चपासून देशभरात आचारसंहिता लागू झाली आहे.

आयोगाकडे आलेल्या तक्रारींमध्ये भाजपाविरोधात ५१, काँग्रेसविरोधात ५९,  तर ९० तक्रारी इतर राजकीय पक्षांविरोधात असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

निवडणूक प्रचारावेळी काही महिला उमेदवारांविरोधात आक्षेपार्ह टिप्पणी केल्याप्रकरणी निवडणूक आयोगानं संबंधित नेत्यांना नोटीस बजावली आहे. अशा काही घटना वगळता बहुतांश राजकीय पक्ष आणि उमेदवार आचार संहितेच्या नियमांचं पालन करत असल्याबद्दल आयोगानं समाधान व्यक्त केलं आहे.

**<><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज झारखंडमधील तीन उमेदवारांची आणखी एक यादी जाहीर केली. दीपिका पांड्ये-सिंह यांना गोडा लोकसभा मतदार संघातून, चरक लोकसभा मतदार संघातून कृष्णानंद

त्रिपाठी यांना उमेदवारी जाहीर केली आहे. अनुपमा सिंह या धनबाद मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत.

<><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगानं नागरी सेवा परीक्षा २०२३ चे अंतिम निकाल जाहीर केले आहे. त्यात आदित्य श्रीवास्तव पहिला, अनिमेष प्रधान दुसरा, तर दोनुरु अनन्या रेड्डी तिसऱ्या क्रमाकांवर आहे. आदित्य श्रीवास्तव हा आयआयटी कानपूरचा विदयुत अभियांत्रिकी पदवीधर आहे.

या परीक्षेला ६ लाखापेक्षा जास्त उमेदवार बसले होते. आयोगानं एकूण १ हजार १६ उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. त्यात ३५२ मुलींचा समावेश आहे. पहिल्या २५ जणांमधे १० मुलींचा समावेश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, यशस्वी उमेदवारांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><>

मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृति प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार यंदा जेष्ठ चित्रपट अभिनेते अमिताभ बच्चन यांना जाहीर झाला आहे. प्रदीर्घ संगीतसेवेसाठी मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार जेष्ठ संगीतकार ए आर रेहमान यांना प्रदान केला जाईल. पंडीत हृदयनाथ मंगेशकर यांनी आज यंदाच्या पुरस्कारांचा घोषणा केली. मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कारामधे नाट्य - चित्रपट सेवेसाठी अशोक सराफ
चित्रपट क्षेत्रासाठी - पद्मिनी कोल्हापुरे
संगीत क्षेत्रासाठी - रुपकुमार राठोड

पत्रकारिता क्षेत्रासाठी - भाऊ तोरसेकर

नाट्य क्षेत्रासाठी - अतुल परचुरे तर

उत्कृष्ठ चित्रपट निर्मीतीसाठी - रणदीप हुडा यांना विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे.

२०२३ - २४ या वर्षाकरता उत्कृष्ट नाट्य निर्मितीसाठी मोहन वाघ पुरस्कार गालिब या नाटकाला, समाजसेवेसाठी आनंदमयी पुरस्कार, दीपस्तंभ फाऊडेशन मनोबल, तर साहित्य सेवेसाठी वाग्विलासीनी पुरस्कार मंजिरी फडके यांना जाहीर झाला आहे. येत्या २४ तारखेला मुंबईत जेष्ठ गायिका आशा भोसले यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><><>**

टेबल टेनिस विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या अव्वल खेळाडू, मायका बत्रा आणि श्रीजा अकुला यांनी आज चीनमधील मकाओ येथे महिला एकेरी गटात जोरदार सुरुवात केली. जागतिक क्रमवारीत ३७व्या स्थानी असलेल्या मनिका बत्राने रोमानियाच्या अदिना डिकानोचा ३-१ असा पराभव केला, तर श्रीजा अकुलाने पोलंडच्या नतालिया बजोरचा ४-० असा सरळ गेममध्ये पराभव केला.

त्यांच्या पुढील गट सामन्यांमध्ये, बत्रा उद्या जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या मन्यु वांगशी भिडणार आहे. तर श्रीजा तिच्या शेवटच्या गट सामन्यात आणखी एका चिनी खेळाडू चेन मेंग ला लढत देणार आहे.

पुढील सामन्यांमध्ये विजय मिळवल्यास भारतीय खेळाडूंचे बाद फेरीतील स्थान निश्चित होईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता इथं ईडन गार्डन मैदानात, कोलकता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकता नाईट रायडर्सच्या ८ षटकात १ बाद ७४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मुंबई, ठाणे, रायगडसह संपूर्ण कोकणात उद्या उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मुंबई, ठाणे आणि रायगडमध्ये काल आणि आज उष्णतेची लाट होती. नवी मुंबईत रबाळेत ४२ अंश सेल्सियस इतक्या कमाल तपमानाची नोंद झाली. ठाण्यात ४१ अंश सेल्सियस, सांताक्रूझ भागात ३७ पूर्णांक ९  अंश सेल्सिअस कमाल तपमान होतं. राज्यात मालेगाव इथं ४२ पूर्णांक ६ अंश सेल्सियस इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली.

गेल्या २४ तासात विदर्भात काही ठिकाणी गारांसह पाऊस झाला. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य

महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात येत्या चोवीस तासात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

येत्या तीन दिवसांत आंध्र प्रदेश आणि तेलंगणा, तसंच ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या काही भागांत येत्या चार दिवसांत उष्णतेची लाट पसरणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

ईशान्य आणि दक्षिण भारतात  येत्या २१ तारखेपर्यंत  हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, तसंच या भागात बर्फवृष्टी, पाऊस आणि विजांच्या कडकडाटासह वादळीवाऱ्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली  आहे.

**<><><><><>**

इस्राइल-इराणमधल्या संघर्षामुळं देशातल्या शेअर बाजारात आजही मोठी घसरण झाली. सेन्सेक्स ४५६ अंकांनी घसरुन ७२ हजार ९४४ अंकांवर बंद झाला. निफ्टी सव्वाशे अंकांनी घसरुन २२ हजार १४८ अंकांवर बंद झाला.

**//<><><><><>//**